ISSN-2229-6476



An Internationally Referred, Registered & Peer Reviewed, Reputed Research Journal in History

इतिहास संशोधन त्रैमासिक

# कंधारपूर

वर्ष तिसरे ▪ अंक पहिला ▪ ऑक्टोंबर ते डिसेंबर २०१२

मुख्य संपादक
सौ. रमाताई कठारे

संपादक
डॉ. विजया साखरे



कार्यकारी संपादक
डॉ. अनिल कठारे

ISSN - 2229-6476

# १४) दुर्मिळ मुर्तिशिल्प लक्ष्मी-नारायण

प्रा.डॉ.वसंत व्यंकटराव कदम, इतिहास विभाग प्रमुख, हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर

महाराष्ट्रातील नांदेड जिल्हयात एकूण सोळा तालुके आहेत त्यापैकी हिमायतनगर (वाढोणा) हे एक तालुक्याचे ठिकाण असुन, या परिसराला प्राचीन इतिहास व संस्कृतिचा मोठा वारसा मिळालेला आहे. हे नगर नांदेड पासून पुर्वेस साधारणपणे ८० कि.मी. वर आहे. तर नांदेड जिल्हयातील शिऊर येथील लेण्याना महाराष्ट्र शासनाने इ.स.१९८५ मध्ये 'संरक्षित स्मारक' म्हणून मान्यता दिली ते स्थळ याच परिसरात आहे. तसेच या परिसरात वाकाटक, राष्ट्रकूट, कल्याणीचे चालुक्य आणि देवगीरीच्या यादव काळातील असंख्य पुरातत्वीय अवशेष आणि मूर्तिशिल्प मोठया प्रमाणात आढळून येतात. त्यापैकी दूर्मिळ मुर्तिशिल्प 'लक्ष्मी-नारायण' विषयी माहिती प्रस्तुत शोध निबंधात दिली आहे.

**मुर्तिनिर्मितीचा प्रारंभ :-**

मुर्तिशिल्प निर्मितीच्या प्रक्रियेला नेमका केंव्हा प्रारंभ झाला या विषयी इतिहासकारात एकमत नाही. परंतु सिंधू संस्कृतीच्या पूर्वी मुर्तिशिल्प निर्मितीला प्रारंभ झाला आसावा. कारण सिंधू संस्कृतिच्या उत्खननात काही धातुच्या तर काही पाषाण मुर्ती सापडल्या आहेत. पौराणिक काळात मुर्तिनिर्मिती व शिल्पकला अस्तित्वात असल्याचे दाखले. तत्कालीन वाड्.मयात मिळतात. रामायण काळात रामाने अश्वमेध यज्ञ केला. त्या यज्ञ प्रसंगी रामाची पत्नी सिता उपस्थित नव्हती, त्यामुळे तिची प्रतिकात्मक सुवर्णाची मुर्ती बनवून ठेवली होती. तसेच महाभारताच्या काळात १८ दिवसाच्या कौरव व पांडव यांच्यातील युध्द समाप्तीनंतर धृतराष्टाने श्रीकृष्णा जवळ भिमास भेटण्याची तिव्र इच्छा प्रगट केली. त्यावेळी अंध धृतराष्ट्राच्या मनातील दुष्ट हेतू श्रीकृष्णाने लक्षात घेऊन भिमाची लोह मुर्ती तयार करुन घेतली व ती मूर्ती भेटीच्या प्रसंगी धृतराष्टासमोर उभी केली. त्यावेळी त्याने त्या भिमाच्या लोहमुर्तिस अलिंगन दिले व घट्ट आवळले त्यामुळे त्या मुर्तिचे तुकडे झाले. यावरुन त्या काळातही मुर्तिकला अस्तित्वात असल्याचे स्पष्ट होते. त्याच बरोबर एकलव्याने देखील आचार्य द्रोणाची प्रतिकात्मक प्रतिमा, मूर्ती तयार करुन त्या मुर्तीस आपला गुरु मानून धनुर्विद्येचे ज्ञान संपादन केले. पुढेही मुर्ती निर्मितीची प्रक्रिया अशीच सुरु राहिली, परंतु इतिहास संशोधक गणेश हरी खरे यांच्या मते, सर्व प्रथम जैन धर्मात मूर्ती बनविण्यात आल्या

ISSN - 2229-6476
त्यानंतर बौध्द धर्मात आणि शेवटी वैदिक म्हणजेच हिंदू धर्मात मूर्ती निर्माण करण्याची परंपरा सुरु झाली. त्यापैकी हिंदू धर्मात ज्या मुर्ती निर्माण केल्या गेल्या त्यामध्ये शिव, पार्वती, विष्णू, गणपती, स्कंद कार्तिकेय, नागमूर्ती, गजानन, ब्रम्हदेव, लक्ष्मी-नारायण, गजलक्ष्मी, नृत्यदेवता, सप्तमातृका, दुर्गादेवी, वृषभ, नृसिंह, श्री लक्ष्मी नृसिंह, सरस्वती, महिषासुरमर्दिनी, नर्तकी, सेविका इत्यादी मूर्ती विशेष ठरतात.

**लक्ष्मीनारायण मुर्तिशिल्प :-**

भारतीय कलास्थापत्या मधील शिल्पस्थापत्याचा विकास प्रामुख्याने दक्षिण भारतात झाला. कारण मोठया प्रमाणात शिल्पस्थापत्य दक्षिण भारतात पहावयास मिळतात. हिंदू किंवा वैदिक धर्मात ब्रम्ह, विष्णू व महेश हया प्रमुख देवता ठरतात. परंतु या देवताशिवाय विविध देवदेवतांच्या असंख्य मूर्ती निर्माण करण्यात आल्या त्यापैकी 'लक्ष्मीनारायण मुर्तिशिल्प' विशेष उल्लेखनीय आणि दुर्मिळ ठरतात. ज्या प्रमाणे शिव-पार्वतीच्या अलिंगन मुर्तिस 'उमामहेश्वर' किंवा शिवपार्वती या नावाने ओळखले जाते त्याच प्रमाणे लक्ष्मी आणि विष्णू नारायणाच्या मुर्तिस 'लक्ष्मीनारायण' मूर्ती म्हणून ओळखले जाते. शिव-पार्वती किंवा उमामहेश्वर अलिंगन मूर्ती सारख्याच लक्ष्मी-नारायणाच्या मुर्ती निर्माण केल्या गेल्या परंतू, उमामहेश्वर मूर्ती असंख्य आणि अनेक ठिकाणी आढळून येतात. पण 'लक्ष्मीनारायण' मुर्तिशिल्प दुर्मिळ स्वरुपात आढळतात.

नांदेड जिल्हयात हिमायतनगर (वाढोणा) हे एक तालुक्याचे मुख्य ठिकाण असुन, या परिसराला इतिहास व संस्कृतिचा मोठा वारसा प्राप्त झाला आहे. याच ठिकाणी पंचक्रोशीत प्रसिध्द असलेल्या श्री परमेश्वर मंदिरालगत शिवापती मंदिर आहे. या मंदिरात अनेक मुर्तिशिल्पांचा समुह आहे. त्या मूर्ती समूहापैकी एक असनस्थ स्थितीत उत्तराभिमुख लक्ष्मीनारायणाची मूर्ती वैशिष्टयेपूर्ण ठरते. तसेच ती भारतीय मुर्तिकलेचा उत्कृष्ट नमुना असलेली अखंड पाषानात निर्माण केलेली मूर्ती आहे. ही लक्ष्मीनारायण मूर्ती आसनस्थ असुन, या मुर्तिची उंची ११३ सें.मी. आहे तर जाडी ५४ सें.मी. आहे. ही लक्ष्मी व्दिभूज तर नारायण चतुर्भूज असून नारायणाच्या उजव्या वरच्या हातात चक्र आहे, तर उजव्या खालच्या हातात शंक आहे. डाव्या वरच्या हातात गदा असून डाव्या खालच्या हाताने लक्ष्मीला अलिंगन देऊन तो हात स्तनस्पर्श दिसतो ही लक्ष्मीनारायण मूर्ती आसनस्थ असून, लक्ष्मी ही नारायणाच्या डाव्या मांडीवर आसनस्थ आहे. नारायण आसनस्थ असुन, तो मनुष्यरुपी गरूडावर बसलेला आहे. गरुडाच्या डाव्या हातावर विष्णूनारायणाचा एक पाय आहे तर मनुष्यरुपी गरूडाच्या उजव्या हातावर विष्णुनारायणाचा दुसरा पाय आहे. लक्ष्मी आणि नारायणाच्या मस्तकावर आकर्षक मुकूट, मस्तकाच्या पाठीमागे प्रभामंडळ आहे. कानात कुंडले.

ISSN - 2229-6476
गळ्यात कंठहार, दंडात बाजुबंध दोहोच्या अंगाखांदयावर उदरबंध व जानवे, हातात कंगन असून, पायात तोडे आहेत.

अशीच दुसरी एक लक्ष्मीनारायण मूर्ती हिमायतनगर (वाढोणा) नगराच्या मध्यभागी पोच्चमा देवी मंदिर आहे. या मंदिराच्या समोर डॉ.अशोक उमरेकर यांचा दवाखाना आहे. या दवाखान्याच्या वरच्या मजल्यावर एक उत्कृष्ट लक्ष्मीनारायण मूर्ती पहावयास मिळते. येथील लक्ष्मीनारायण मुर्तिची उंची १०० सें.मी. असुन जाडी ४० सें.मी. आहे. ही मुर्तिदेखील मनुष्यरुपी गरुडावर असनस्थ असुन, बाकी सर्व आयुधे आणि सर्व स्थिती शिवापती मंदिरात असलेल्या लक्ष्मीनारायण मूर्ती प्रमाणेच आहेत. अशा प्रकारच्या 'लक्ष्मीनारायण' मूर्ती नांदेड जिल्हयात विष्णुपूरी हे स्थळ सोडले तर हिमायतनगर या एकाच नगरात पहावयास मिळतात हे या नगराचे आणि परिसराचे महत्वपूर्ण वैशिष्टये मानावे लागेल.

**संदर्भ सूची :-**


१) डॉ.देशपांडे सु.र., भारतीय शिल्प वैभव, पुणे मेहता पब्लिशिंग हाऊस, सदाशिवपेठ पुणे जाने. २००५.

२) डॉ.कठारे अनिल व प्रा.साखरे विजया., भारतीय कलेचा इतिहास, कंधार, कल्पना प्रकाशन कंधार जाने.२००८

३) डॉ.कठारे अनिल व प्रा.साखरे विजया., मंदिर आणि मुर्तिशिल्प, नांदेड, अल्फा पब्लिकेशन्स, नांदेड. डिसें.२००८.

४) डॉ.जोशी नि.पु., भारतीय मुर्तिशास्त्र, नागपूर, म.वि.ग्रं.नि.मं. १९७९.

५) डॉ.श्रीवास्तव बृजभूषण, प्राचीन भारतीय प्रतिमा विज्ञान एवं मुर्तिकला, वाराणसी, विश्वविद्यालय प्रकाशन, व्दितीय आवृत्ती, १९९०.

६) मादसवार अनिल, संवादात दैनिक भास्कर, मॉ महिषासुरमर्दिनी की मूर्ती मिली खुदाई में हिमायतनगर, २० फरवरी २०११